# - प्रेस नोट -

दि. १९/०८/२०२६

## <u>ताडदेव पोलीस ठाणे - खुनाचा प्रयत्न</u>

दि.१७.०८.२०२६ रोजी १५.५० वा.च्या सुमारास फिर्यादी बिलाल सलीम शेख, वय-५१ वर्षे, धंदा- मासेमारी, रा.ठी.- ताडदेव, मुंबई यांचा मित्र जखमी इसम जनत सिंग वय-३५ वर्षे हे प्रोमोनेड जवळ, कोस्टल रोडखाली, ताडदेव,मुंबई येथे कचरा वेचण्याचे काम करित असताना अटक आरोपी पुरुष वय-४५ वर्षे त्याचे जवळ आला व त्यास फिरायला प्रोमोनेड दिशेने घेऊन गेला तेथे अटक आरोपी याने दारू पिण्यासाठी त्याच्याकडे पैसे मागितले. सदरवेळी फिर्यादी यांचा मित्र जतन सिंग याने पैसे नसल्यामुळे पैसे देण्यास नकार दिल्याने अटक आरोपी याने त्यास पैसे न दिल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादी यांचा मित्र जनत सिंग याने पैसे नसल्याचे सांगितले असता अटक आरोपीने बाजुला पडलेली काचेची बॉटल जमिनीवर फोडुन काचेच्या बॉटलने त्याच्या गळयावर वार केले. सदरवेळी अटक आरोपी याने हातातील बॉटल हवेत फिरवत तेथील लोकांना पुढे आल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. म्हणून फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दि.१८.०८.२०२६ रोजी गु.र.क्र.३४७/२०२६ कलम १०९(१), ३५१(३) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---------------------